# आजोबा गणपती

सोलापूर हे स्वातंत्र लढयापासून सर्वार्थाने नावाजलेले शहर सवातंत्र चळवळ असो किंवा राजकीय, समाजिक घडामोडी असो सोलापूरकरांनी नेहमी आपला वेगळा ठसा देशावर उमठवला आहे. अध्यात्मिक व धार्मिक क्षेत्र ही याला अपवाद नाही श्रध्दानंद समाजाचा मानाचा आजोबा गणपती हा तर सोलापुरच्या अध्यात्मिक क्षेत्राचा मानबिंदूच. आजोबा गणपती म्हटले की सर्व लहान थोर गणेश भक्तांच्या डोळयासमोर एक आकर्षण व विशिष्ट श्री गणेशाची मूर्ती नजरेसमोर येते. भक्तांला पवणारा श्री गणराया अशी आजोबा गणपतीची ख्याती आहे. अशा या श्रध्दानंद समाजाच्या आजोबा गणपतीला १२९ वर्षाची मोठी परंपराल लाभली आहे. आजोबा गणतीच्या प्रतिष्ठापनेला शतकोत्तरी रौप्य महोस्तवी वर्ष पूर्ण झाले आहे.

**१८८५ मध्ये आजोबा गणपतीची स्थापना**

भारतीय समाजाला एकत्रित आणून लोकसंघटन व लोक जागृती निर्माण करण्यासाठी आणि स्वातंत्र्याची चळवळ सामान्य जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी लोकमान्य टिळक यांनी गणेशोत्सवाला सार्वजनिक स्वरुप प्राप्त करुन दिले. स्वातंत्र लढयाला प्रेरक अशी शक्ती गणेशोत्सवातून निर्माण झाली. महाराष्ट्रात १८९३ मध्ये सार्वजनिक गणेशोत्सवाला सुर्वात झाली. परंतु त्यापूर्वीच ८ वर्षे अगोदर म्हणजे १८८५ मध्ये सोलापूरातील शुक्रवार पेठेतील कार्यकर्त्यांनी एकत्रित येवून सार्वजनिक स्वरुपात आजोबा गणपतीची स्थापना केली भारतीय असंतोषाचे जनक श्री लोकमान्य टिळक १८७५ पासुन सोलापूरात येत असत गणेशोत्सवाला सार्वजनिक सवरुप देण्याची प्रेरणा लोकमान्यांना सोलापूरातील शुक्रवार पेठेतील आजोबागणपती कडून मिळाली असे मानले जाते.

आजोबा गणपतीच्या स्थापनेसाठी त्यावेळचे कार्यकर्ते मल्लिकार्जुन कावळे,महालिंगप्पा वजीरकर, मल्लिकार्जुनप्पा शेटे, संगनबसय्या नंदीमठ, देवबा मंठाळकर, देशमुख, गणेशारी, पारकर, म्हमाणे, ओणामे, दर्गोपाटील, नंदयाळ,आवटे आदी घराण्यातील व्यक्ती एकत्रित आले होते. आजोबा गणपती सुरुवातीला काही वर्षे शुक्रवार पेठेतील शेटे यांच्या घरासमोर व त्यानंतर त्रिपूरांतकेश्वर मंदीरात बसवून तेथेच गणेश उत्सव साजरा करण्यात येत होता

त्यानंतर अनेक वर्षे माजी महापौर स्व. विश्वनाथ बनशेटटी यांच्या माणिक चौकाजवळील ट्रंक कारखान्यत गणेश उत्सवात आजोबा गणपती बसविण्यात येत होता.

## श्रध्दांनद समाजाची स्थापना

लाला मुनसीराम हे लाहार उच्च न्यायालयातील प्रसिध्द वकील होते. त्यांनी सन्यास घेतल्यानंतर ते स्वामी श्रध्दानंद या नावाने ओळखले जात असत. बनारस येथे स्वामी दयानंद सारस्वतीचे भेट झाल्यानंतर ते आर्य समाज संस्थेत दाखल झाले होते. १८ डिसेंबर १९२६ रोजी एका धर्मार्थ माथेफिरु तरुणांने त्यांच्या निवासस्थानी जाणून बंदूकीची गोळी झालून त्यांचू हत्या केली. या घटनेच्या निषेर्धाथ सोलापूरात बंद पाळण्यात आला होता. त्या दिवशी सोलापूरातील कै. सिद्रामप्पा फुलारी, कै. रेवणसिध्दप्पा खराडे, कै. नागप्पा शरणाथो, कै. नागय्या धोत्री, कै. इरय्या कोरे आदिनी त्रिपुरांतकेश्वर देवालयात एकत्रित येवून त्यांचो स्मृती व कार्य नागरिकानसमोर ठेवण्यासाठी श्रध्दानंद समाजाची स्थापना केली श्रध्दानंद समाजाची स्थापना झाल्यानंतर केवळ गणेशोत्सव साजरा न करता तरुणांन मध्ये उत्साह आत्मविश्वास व राष्ट्रप्रेम निर्माण करण्याच्या उददेशाने कै. सिद्रामप्पा फुलारी यांनी लाठी,तलवार व दांडपटटा चालविण्याचा वर्ग सुरु करुन त्यांचे प्रशिक्षण दिले. त्यामुळे कार्यकत्यांची नवी फळी उभी राहीली श्रध्दानंद समाजातर्फे व्यायाम शाळा ही इ.स. १९४२ साली सुरु करण्यात आली यामध्ये ही कै सिद्रामप्पा फुलारी यांचे योगदान खुप मोलाचे आहे. त्या व्यायाम शाळेचे व्यवस्थापक म्हणून हुतात्मा कै. मलप्पा धनशेटटी हे होते कै सिद्रामप्पा फुलारी यांनी तरुणांमध्ये उत्साह निर्माण करण्यासाठी सतत ५२ तास लाठी फिरविण्याचा विक्रम सोलापूरातील सिध्देश्वर मंदीरात केला होता. श्रध्दानंद समाजाच्या निर्मितीत व उभारणीत कै. सिद्रामप्पा फुलारी, कै. पंचप्पा जिरगे, कै. रेवणसिध्दप्पा खराडे, कै. इरप्पा कोरे, कै. बाबुराव कावळे, कै. गंगाधर हब्बु, कै. डॉ. चिकविरय्या नंदीमठ, कै बाबुराव विंचुरकर, कै. गुंडला, कै. लक्ष्मणराव भांबूरे, कै. गुंडप्पा उंबरजे, कै. सिद्रमप्पा गुज्जे, कै. शिवशंकरअप्पा पटणे, कै. मल्लिकार्जुन अप्पा देशमुख, कै. वैकप्पा वडजे, कै तात्याबा सलगर, कै. काशिनाथ महिंद्रकर, कै. रामभाऊ कळमणकर, कै. रामभाऊ निंबर्गीकर , कै शिवप्पा साबळे, कै. रामभाऊ नायडू, कै. बाबुराव लालबोंद्रे, कै. विश्वनाथ मंठाळकर, कै. नागनाथ रसाळे, कै. विश्वनाथ बनशेटटी आदीचा वाटा आहे. ब्रिटीशांनी श्रध्दानंद समाजाच्या कार्यावर स्वातंत्र चळवळीच्या कार्यावर बंदी घातल्यानंतर सर्व कागदपत्रे

जाळण्यात आली होती . महात्मा गांधीना अटक झाल्यानंतर कायदेभंगाची चळवळ चालू राहण्यासाठी शेठ गुलाबचंद वालचंद यांनी श्रध्दानंद समाजाच्या कार्यकर्त्यांना आर्थिक मदत करुन स्वातंत्र चळवळीला चांगला हातभार लावला .

**गणेशोत्सवातील मेळे गाजले .**

कै . कवी संजीव , कै . अंबण्ण शेडजाळे, कै . शाम सांगळे, कै . शिवलिंगप्पा जिरगे, कै . चिंकविरय्या स्वामी , कै . माधवराव दिक्षीत यांच्या उत्तमो उत्तम संवादामुळे त्याकाळात हे मेळे खुप लोकप्रिय झाले . संभाजी महाराजाचा वध, आग-याहून सूटका, बाजीप्रभू आदीविषयावर मेळे झाले . तर महाराष्ट्राचा मुकुट, तेजस्वी तारा, क्कितूतचन्नम्मा की नाटके ही श्रध्दानंद समाजाच्या गणेशोत्सवात सादर करण्यात आली .

**शुक्रवार पेठ ही स्वातंत सैनिकांची पेठ म्हणून ओळखली जाते .**

श्रध्दानंद समाजाचे कै . सिद्रामप्पा फुलारी यांनी नगराध्यक्ष पद भूषविले . कै . चंद्रशेखर म्हमाणे हे स्वातंत्र सैनिक उच्चाधिकार समितीचे अध्यक्ष पद भूक्षविले, कै . विश्‍वनाथ बनशेटटी महापौर पद भूषविले . श्री प्रभाकर वनकुद्रे, सौ . रोहिणी तडवळकर,श्री चिदानंद वनारोटे,सौ . शोभा बनशेटटी, सौ . स्नेहल निंबाळे यांना पालिकेत नगरसेवक म्हणून काम करण्याची संधी मिळाली . सध्या आजोबा गणपतीची जबाबदारी अध्यक्ष : ॲड गौरीशंकर फुलारी, उपाध्यक्ष चिदानंद वनारोटे,सचिव : अनिल सावंत, सहसचिव : कमलाकर करमाळकर, कोषाध्यक्ष : चंद्रकांत कळमणकर हे सभांळत आहेत .

## समाजिक बांधलिकी जाणीव करुन देणारा : आजोबा गणपती

स्वातंत्रेच्या आंदोलनाबाबत राष्ट्रीय भावना जागविण्यासाठी लोकमान्य टिळकांनी १८९३ सली महाराष्ट्रांत सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात केली. मात्र त्याआधी १८८५ सालापासून सोलापूरात आजोबा गणपतीच्या रुपाने सार्वजनिक गणेशोत्सव प्रारंभ झालेला होता. लोकमान्य टिळक सेलापूरात कै. आप्पासाहेब वारद योंचकडे आले असताना शुक्रवार पेठेतील आजोबा गणपती उत्सवात पानसुपारी कार्यक्रमास उपस्थित राहिले. कार्यक्रमासाठी क्षकत्रित येणारे नागरिक पाहुन टिळकांना सार्वजनिक गणेशोत्सवाची कल्पना सुचली असे जुन्या पिढीतील लोकांकडून सांगण्यात येते. यावरुन सार्वजनिक गणेशात्सव या संकल्पनेचा उगम आजोबा गणपती ट्रस्टकडुन झाला आहे म्हणता येईल.

सध्या सगळीकडेच पर्यावरण पुरक इको फ्रेडली गणेशोत्सव साजरा करण्याची मागणी होत आहे. मात्र १२९ वर्षापुर्वीच सोलापूरच्या आजोबा गणपती ट्रस्टने या संकल्पनेची मूहूर्तमेढ रोवली. इ. स. १९८५ साली रददी कागद कामटया , खळ, डिंक,कापड आदि पर्यावरण पुरक साधनांचा वापर करुन श्री ची सुंदर व सुबक मुर्ती तयार करण्यात आली ख-या अर्थाने इको-फ्रेडली गणेशोत्सव या संकल्पनेचा उदगाता देखील आजोबा गणपती आहे. व ते भारतातील पहिले इको फ्रेंडली म्हणल्यास वावगे ठरणार नाही.

१९८५ सालची मुर्ती जुनी झाल्याने १९९३ सली केरळच्या कलाकाराकडून तणस, गुळ, कापड, गवत , शाडू ,डिंग, या साहित्याचा वापर करुन शास्त्रशुध्द पध्दतीची मुर्ती बनविण्यात आली. केवळ सुरुवात न करता इको-फ्रेडली गणेशोत्सवाचा आजपर्यंत आजपर्यंत अवलंब करण्याचा आदर्श सार्वजनिक आजोबा गणपती ट्रस्टने गणेशोत्सव मंडळासमोर ठेवला आहे.

लोकमान्य टिळकांनी राष्ट्रीय ध्येय समोर ठेवून गणेशोत्सव प्रारंभ केला. मात्र स्वातंत्रप्राप्ती झाल्यानंतर विविध सामाजिक कार्यातून आजोबा गणपतीने समाजाशी असलेली सामाजिक बांधलिकी जपली , आजोबा गणपतीने सामाजिक बांधिलकी जपत असताना इतर गणेशोत्सव मंडळांना सामाजिक बांधिलकीची जाणीव करुन दिली असे या ठिकाणी म्हणता येईल.

शुक्रवार पेठ येथ स्वामी श्रध्दानंद यांच्या कार्याची प्रेरणा घेऊन समाजधुरीणींनी त्रिपुरांतेश्वर मंदिरात एकत्र येऊन श्रध्दानंद समाजाची स्थापना केली श्रध्दानंद समाजाच्यावतीने गणेशोत्सव साजरा करताना तरुणामध्ये राष्ट्रभक्ती निर्माण करण्याचा उदश समोर ठेवण्यात आला . याकरिता श्रध्दानंद व्यामशाळा दांडपटटा वर्ग चालु करण्यात आले तरुणामध्ये उत्साह, आत्मविश्वास आणि वैचारिक प्रबोधन निर्माण होण्याकरिता युवक मेळावे भरविले जात . स्वातंत्र चळवळीत सहभागी होणा-या तरुणामध्येशुक्रवार पेठेतील तरुणांची संख्या त्याकाळी मोठी होती त्यामुळे स्वातंत्र सैनिकांची पेठ अशीही शुक्रवार पेठेची ओळख आहे .

आजपर्यंत अनेक सामाकि उपक्रम ट्रस्ट राबवित आहे . त्यामध्ये नैसर्गिक आपादग्रस्तांना मदत , गरीब रुग्णांना आर्थिक व वैदयकिय मदत, कुष्ठरोग्यांना मिष्ठान्न वाटप, बालसुधार गृहामध्ये फळे वाटप, मुक्या जनावरांसाठी पाणपोई , विदयार्थ्यांना शालेय साहित्य वाटप , गुणवंत विदयार्थ्यांचा सत्कार, लर्निंग लायसन्स शिबीर, वृक्षारोपण, हुंडाबळी, ऐच्छिक रक्तदान, स्त्रीभून हत्या विरोधी जनजागरण, लेक वाचवा , पाणी वाचवा , जलपूर्नभरण , स्त्रीयावरील अत्याचार या विषयावर जनजागृती . समाजातील विविध यशवंत मान्यवरांचा सत्कार किी येथील भुकंप ग्रस्ताना मदत, पशु-पक्षाना पाणपोई, रक्तदान शिबीर, मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार शिबीर, तुळजापूर , श्रीशैल , गुडडापूर, ,६८ लिंग येथे जाणा-या भाविकांना प्रसाद वाटप , श्री सिध्देश्वर महाराजाच्या पालख्या , चन्नविर शिवाचार्य आत्मज्योत इ . यात्रेचे स्वागत , दूर्धर आजाराने त्रस्त रुग्णांना मदत अशा सामाजिक उपक्रमांची रेलचेल आजोबागणापती ट्रस्टच्या कार्यात आपल्याला पहावयास मिळते .

समाजातील लोकांच्या सहभागाने , लोकांकडून जमा होणारी वर्गणी यातून कांही तरी समाजाचे देणे लागतो हि भावना उत्सव मंडळामध्ये रुजविण्यात आजोबा गणपती यशस्वी झाला आहे . , हे सध्या सोलापूरातील गणेशोसत्व मंडळाच्या उपक्रमातून दिसून येते

आगामी काळात आजोबा गणपती आरोग्य सेवा केंद्र , आजोबा गणपती ध्यान मंदित, आजोबा गणपती संस्कार केंद्र आजोबा गणपती वसतीगृह आदि उपक्रम राबिविण्याचा ट्रस्टचा मानस आहे . आजोबा गणपतीला जगासमोर जोडण्यासाठी आजोबा गणपती वेबसाईट ब ई सेवा काढण्यात आली आहे .

आजोबा गणपतीची मुतो बैठी असून तिचे चारही हात सुटे आहेत. डाव्या हाता मोदक आहे तर उजवा हात अर्शिवाद देत आहे. डोक्यावर सुंदर सोन्याचा मुंकूट असून सोडेवरती नक्षीकाम केले आहे. मुर्तीचे डोळे कमालीचे बोलके असून या डोळयामध्ये गणरायाची सारी प्रसन्नता , सात्विकता आणि उदारता एकवटली आहे, भक्तांना या गणेशमूर्तीचे तेज जाणवते. सोन्याच्या विविध प्रकारच्या दागिन्यांनी वढवलेल्या मुर्तीचे वैभव दिसते, तसेच मुतोच्या बोलक्या डोळयातून व्यक्त होणारे भावही अनुभवता येतात दर्शनासाठी येणारी भाविक मुर्तीसमोर नकळततच नतमस्त होतो.

आजोबा गणपतीचे १९९४ मध्ये माणिक चौक येथे स्वतःच्या जागेत आकर्षक मंदिर उभारण्यात आले , तेव्हापासून मंदिरात नित्यनियमाने शास्त्रोक्त पध्दतीने दररोज सकाळ व संध्याकाळ पुजा व आरती होते. याठिकाणी गणेश चतुर्थी , संकष्टी चतुर्थी , अंगारकी चतुथो, गणेश जयंती, दसरा, दिवाळी, पाडवा, महाशिवरात्र या दिवशी हजारो भाविक दर्शनाला येतात , दर चतुर्थीला आजोबा गणपती महिला मंदळातर्फे अथर्वशीर्ष पठण केले जात.

सध्या आजोबा गणपती ट्रस्टचे अध्यक्ष : ॲड गौरीशंकर फुलारी, उपाध्यक्ष चिदानंद वनारोटे,सचिव : अनिल सावंत, सहसचिव : कमलाकर करमाळकर, कोषाध्यक्ष : चंद्रकांत कळमणकर व प्रसिध्दीप्रमुख - सिध्दारुढ निंबाळे हे कामकाज पहात आहेत

इतकेच नव्हेतर शहरातील मध्यवर्ती गणेशोत्सव मंडळाच्या विसर्जन मिरवणूकतीतही आजोबा गणपतीला मान आहे. मिरवणूकीत सर्वात शेवटचा मानाचा गणपती हा आजोबा गणपती असतो , विविध सोन्या-चांदच्यिा आभुषणे , कपडे परिधान केलेला आजोबा गणपती हा मिरवणूकीचा मानबिंदी ठरतो, मिरवणूक मार्गावर शेकडोंच्या संख्येने पुजा केल्या जातात , अग्रभागी ५०० तरुणांचा लेझीम ताफा व १८० युवक युवतीचे ढोल व ताशाचे पथक आहे. व एक सारखा गणवेश, व शांततेने लेझीम व ढोल खोळणारे उत्साही व शिस्तप्रिय तरुण, मर्यादीत आवाजातील वादयवृंद या गोष्टीमुळे पहाणा-यांचा डोळयाचे पारणे फिटल्याशिवाय राहत नाही. अशा राजेशाही पध्दतीने आजोबा गणपतीचे सर्वात शेवटी मान असतो.

धार्मिक, अध्यात्मिक, सामाजिक, सांस्कृतिक व राकीय छेत्रात ठसा उमटविणारा आजोबा गणपती ट्रस्ट हा समस्त महाराष्ट्र व सोलापूरकरांच्या पसंतीत उतरला आहे

समाजमनाचा ठाव घेवुन ट्रस्टच्या वतीने सतत नवनवीन उपक्रम राबविले जात असल्याने मंदीरास येणारे भाविक ट्रस्टचे कौतूक करताना दिसतात.

आजपर्यंत माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी , शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे, माजी केंदीय कृषीमंत्री शरद पवार, माजी केंदीय गृहमंत्री सुशिलकुमार शिंदे, कै. गोपीनाथ मुंढे, केंदीय नितीन गडकरी, विनय कोरे, सिध्दाराम म्हेत्रे, आर.आर.पाटील, दिलीप, सोपल, विजयसिंग मोहित-पाटील , जिल्हाधिकारी, पोलिस आयुक्त, महानगरपालिका आयुक्त, पालकमंत्री आदि मान्यवरांनी आजोबा गणतीच्या दर्शनाचा लाभ घेतलेला आहे, हा ओघ असाच चालू आहे.

## स्वामी श्रध्दानंद

स्वातंत्रपूर्वीच्या राष्ट्रीय नेत्यांच्या यादीमध्ये स्वामी श्रध्दानंद हे काहीसे अपरिचित नाव दुदैवाने स्वामी श्रध्दानंदांच्या देशसेवेचे , त्यगाचे खरे मुल्यमापन देशाने कधी केलेच नाही एक काळ १९१५ ते १९२० चा असा होता की , स्वामी श्रध्दानंद दिल्ली शहराचेच नव्हे तर पंजाब राज्याचे बेताज बादशाह समजले जायचे अखिल भारतीय कॉंग्रेसमध्ये महात्मा गांधी, लाला लजपतराय यांच्यानंतर जनतेचे खरे नेतृत्व या राष्ट्रीय संन्याशाने केले संन्यासी म्हटला की भगवे वस्त्र धारण करुन हिमगिरीच्या गुहेमध्ये अगर मठ-मंदीराच्या आत निवास करणारे ऐहित ऐश्वर्य व प्रतिष्ठेपासुन दूर राहणारे असे काहीसे निरपेक्ष व्यक्तिमत्व डोळयासमोर उभे रहाते पण स्वामी श्रध्दानंद यास अपवाद होते. एक शूर धाडसी नेता, वीर संन्यासी एक असामान्य कार्यकर्ता अशी किर्ती या राष्ट्री नेत्याने मिळविली.

१९ मार्च १९१९ चा तो दिवस इंग्रज सरकारने भारतीय स्वातंत्र चळवळीला चिरडून टाकण्यासाठी रॉलेट ॲक्ट लागू केला. या ॲक्टच्या विरोधात महात्मा गांधीनी सत्याग्रह पुकारला ते या सत्याग्रहासाठी दिल्लीकडे येत असता वाटेत पलवल रेल्वे स्थानकावर इंग्रज सरकारने त्यांना अटक केली अताा सत्याग्रह चळवळीचे नेतत्व स्वामी श्रध्दानंदंकडे आले सभा, संमेलने व मिरवणूकांवर बदी घालण्यात आली होती. तरीही त्यादिवशी हजारो लोक दिल्लीच्या कंपनी बागेत सभेसाठी जमले. त्यातच बातमी आली की , रेल्वे स्टेशन पोलिसांनी गोळीबार केला आहे. हजारो लोक दिल्लीच्या चांदनी चौक बाजारातून स्टेशनकडे निघाले सर्वात पुढे होता त्यांचा नेता स्वामी श्रध्दानंद आज येथे दिल्ली महानगर निगमचे मोठे शासकीय भवन आहे तेथे त्यावेळी घंटाघर होते. पोलिसांनी मिरवणूकीला अडविले मिरवणूक पुढे जाणार नाही कोणी पाऊल पुढे टाकल्यास गोळया घातल्या जातील पोलिसांच्या आदेशाने डगमगला तो वीर संन्यासी कसा? स्वामी श्रध्दानंद यांनी आपली छाती पुढे केली व गोरखा पलटनीच्या नायकाला म्हणाले , चलाओ गोली मैं खाता हू भीडपर बाद मे , पहिले मुझे गोली मारो या असामान्य धाडसाने पोलिस अधिकारी थक्क झाले. सुदैवाने त्याच क्षणी डेप्युटी कमिशनर तेथे आला व त्याने प्रसंग ओळखून मिरवणूकीस पुढे जाऊ दिले. आज तेथे घंटाघर नाही , तेथे उभा आहे स्वामी श्रध्दानंद यांचा पूर्णकृति पुतळा , त्या शूरतेची चिरंतर स्मृति म्हणून सरदार पटेल यांनी या

घटनेविषयी म्हटले होते. त्यांच्या वीरतेने कोण मंत्रमुग्ध होणार नाही. त्या वीर संन्याशाच्या स्मरणाने आमच्या हदयात वीरत्व व बलिदानाची प्रेरणा प्राप्त होवो.

स्वामी श्रध्दानंद यांनी हरिव्दार तेथे आपण स्थापन केलेल्या गुरुकुल कांगडीच्या संचालनाची जबाबदारी १९१५ च्या सुमारास आपल्या इतर सहका-यावर सोपविली आणि त्यांनी महात्मा गांधी यांच्या स्वातंत्र आंदोलनामध्ये उदी घेतली त्यांनी अखिल भारतीय कॉंग्रेसच्या राष्ट्री कार्यात स्वतःस झोकून दिले १९१९ सली कॉंग्रेसचे अधिवेशन अमृतसर येथे भरले. त्यावर्षी एप्रिल महिन्यात जालियनवाला बाग हत्याकांड घडले होते की ज्यामध्ये इंग्रज जनरल जो डायर याने हजारो निरपराध भारतीयांवर ग्रुरपणे गोळीबार केला होता पंजाबच्या खेडोपाडी व शहरा-शहरातून दहशत होती. अशा वेळी कॉंग्रेसचे अधिवेशन भरविणे म्हणजे असामान्य धाडस होते. ही जबाबदारी स्वीकरली स्वामी श्रध्दानंद यांनी , त्यांनी शहरी व ग्रामीण भागात फिरुन पंजाबातील जनतेमध्ये नवजागरण व चैतन्य भरले. ते स्वतः अखिल भारतीय कॉंग्रेसच्या अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष झाले. अमृतसर येथील अधिवेशन म्हणजे गो-या अत्याचारी इंग्रज सरकारला आव्हानच होते व ते स्वीकारण्याचे धाडस दाखविले वीर संन्यासी स्वामी श्रध्दानंद यांनी निर्भय वृति हा स्वामी श्रध्दानंद यांच्या जीवनाचा असामान्य गुण होता. संस्कृत कवि भर्तृहरीने म्हटल्याप्रमाणे

निदन्तु नीतिनिगुणाः यदि वा स्तवंतु
लक्ष्मी समाविशतु गच्छतु वा यथेष्टमा
अदव वा मरणस्तु युगांतरे वा
न्यायात्पथात प्रविचलंति पदं न धीराः

माणसे ज्या न्यायोचित मार्गावर एकदा पाऊल ठेवतात त्यापासुन ते केव्हाही विचलित होत नाहीत.

कॉंग्रेसच्या याच अधिवेशनामधये स्वामी श्रध्दानंद यांनी आणखी एक असामान्य वैशिष्टे दाखविले त्यांनी आपले स्वागताध्यक्षिय भाषण हिंदी भाषेत दिले त्यापूर्वीची स्वागताध्यक्षीय भाषणे व कॉंग्रेसचे सर्व कामकाज इंग्रजी भाषेतूनच चालायचे या पाश्वभूमिवर त्या भारतीय संन्यासाने भातीयतेचा खरा स्वाभीमान दाखवून दिला. स्वामी

श्रध्दानंद यांचे हिंदी भाषण ऐकल्यानंतर एक श्रेता म्हणाला होता , आम्हाला आज वाटले की अखिल भारतीय कॉंग्रेस ही एक भारतीय संघटना आहे. राष्ट्रभाषेचा असा जाज्वल्य स्वाभिमान स्वामी श्रध्दानंद यांनी १९१९ साली बाळगला होता.

या कालखंडामध्ये दिल्ली आणि पंजाबच्या कॉंग्रेसच्या कार्याचे खरे नेतृत्व स्वामीजीकडेच होते. लोक त्यांना दिल्ली के बेताजा बादशाह म्हणायचे स्वामी श्रध्दानंद यांच्या हाकेला हिंदु मुसलमान सर्वच प्रतिसाद दयायचे तसे पाहता स्वामीजी आर्य समाजाचे शीर्षस्थ नेते होते. पण त्यांनी आपल्या निष्काम व निरपेक्ष वृत्तीव्दारे हिंदू-मुस्लिम सर्वांचाच विश्वास संपादन केला होता. ते ख-या अर्थाने राष्ट्रीय संन्यासी होते. एप्रिल १९१९ च्या पहिल्या आठवडयात ब्रिटीश पोलिसांनी काही मुस्लिम सत्याग्रहीना गोळया घालून ठार केले त्यावेळी स्वामी श्रध्दानंद यांनी या अन्यायाच्या विरुध्द आवाज उठविला मुसिलिम या मिरवणूकीचे नेते होते स्वामी श्रध्दानंद दिल्ली येथील प्रसिध्द जामा मजिदीमध्ये स्वामीच्या नेतृत्वाखाली सभा भरली कदाचित ६ एप्रिल १९१९ चा तो दिवस नराळाच असेल की ज्या दिवशी एका हिंदू संन्याशाने जामा मशिदीच्या मिंबरवर उभे राहून आपले भाषण विश्वनि देव सवितर्दुरितानि पतासुवा यद भद्र तन्न आसुवा या वेदमंत्राव्दारे सुरु केले अनेकांना कदाचित माहित नसेल की महात्मा गांधी यांना महात्मा ही पदवी स्वामी श्रध्दानंद यांनीच दिली. त्यावेळी मोहनदास करमचंद गांधी हे अफ्रिकेत समतेचे आंदोलन चालवित होते. त्यांच्या या मानव सेवच्या कार्यास हातभार म्हणून सवामी श्रध्दानंद यांनी २००० रुपयांची देणगी श्री गोपाळ कृष्ण गोखले यांच्या स्वाधीन केली होती. स्वामी श्रध्दानंद यांनी त्यावेळी सन्यासाश्रम स्वीकारला नव्हता त्यांचे मूळ नाव मुंशीराम होते. यांनी आपल्या गुरुकुलीय विदयार्थ्यासोबत हरिव्दार येथील गंगेच्या धरणावर काम केले व त्या परिश्रमातून मिळविलेले दोन हजार रुपये गांधीच्या कार्यास दिले. त्यांच्या या देश व मानवतेच्या कार्याने प्रभावित होऊन मोहनदास करमचंद गांधी हे भारतात परतल्यानंतर प्रथम गुरुकुल कांगडी येथे आले. तेथे त्यांचे वास्तव्य बरेच दिवस होते. मुंशीरामांच्या कार्यामुळे प्रभावित होऊन गांधीजी म्हणाले की, आप मुझे महात्मा क्यों क्हते है? महात्मा तो आप है अशा प्रकारे त्या दिवसापासून मोहनदास करमचंद गांधी हे महात्मा गांधी झाले व आचार्य मुंशीराम यांना लोक महात्मा मुंशीराम म्हणू लागले. महात्मा गांधी महात्मा मुंशीराम यांना बडा भाई म्हणनच आदर देत असत.

स्वामी श्रध्दानंद यांचा बाणा वीराचा तर होताच, स्वाभिमान, सत्य व न्याय असेत त्यावर ते परखडपणे बोलले. ब-याच काळापर्यंत कॉंग्रसेमध्ये राहून त्यांना वाटले की कॉंग्रेस भारतीय समाज सुवारणच्या प्रमुख ध्येयापासून विचलित होत आहे. स्वाभिमान, सत्य व न्याय-प्रियता हे त्यांच्या आत्म्याचे विशिष्ट गुण होते. त्यांनी आपल्या अंतरात्म्याविरुध्द कधीहि कार्य केले नाही. स्वामींनी कॉंग्रेसचा राजीनामा दिला व समाज सुधारणेचे व्रत स्वीकारले. असपृश्योध्दार, स्त्रीशिक्षण, विधवा विवाह, अंधश्रध्दा, बलात धर्म परिवर्तन यासारख्या मोहिमेचे नेतृत्व त्यांनी आंगिकारले. वीर अर्जुन व तेज या दोन स्वतंत्र सामाजिक व राष्ट्रीय बाण्याच्या दैनिक वृतपत्रांचे ते संपादक होते. त्यांनो सामाजिक सुधारणेची चळवळ आपल्या घरापासून सुरू केली. जातीभेद नष्ट व्हायला हवा ही घोषणा न करता त्यांनी विसाव्या शतकाच्या पूर्वार्धामध्ये आपल्या दोन मुलीचे अमृतकला व वेदकुमारी यांचे लग्न आंतरजातीय केले. त्या काळी हे असामान्य धाडस होते. पण स्वतः मार्ग दाखविल्याशिवाय समाज आपल्या पाठीमागे येईल कसा? हा आदर्श त्यांनी मनाशी ठामपणे बाळगला होता. हिंदू, मुस्लिम व सर्व जनतेचा हा पाठिंबा स्वामींना दीर्घकाळ लाभला होता. पण जेव्हा लोक राष्ट्रीयत्व विसरतात व धर्मांध होऊन विवेकभ्रष्ट होतात तेव्हा अशा थोर राष्ट्रीय संन्याशाच्या नशिबी-देखीत एका धर्मांय व्यक्तीच्या हातून मृत्यु लिहिला जातो वास्तविक अशा महान वीर संन्याशाता ब्रिटीश सरकारच्या दडपनितीतून हौतात्म्य लाभावे, असे त्यांचे राष्ट्रीय कार्य होते. पण नियतीला ते मान्य नव्हते. २३ डिसेंबर १९२६ या दिवशी अब्दुल रशीद नावाच्या युवकाने त्यांना ठार कले. स्वामी नुकतेच आजारपणातून उठले होते व विश्रांती घेत होते. अशा वेळी अब्दुल रशीद हा धर्मवेडा युवक त्यांच्या घरी येऊन त्यांना गोळया घालतो काय आणि या राष्ट्रीय वीर संन्याशाचे जीवनकार्य संपुष्टात आणतो काय? पण स्वामी जसे स्वाभिमानी व धाडसी जीवन जगले, तसेच वीरमरणहि त्यांना लाभले. तेव्हा अब्दुल रशीद याने एका अर्थाने या महात्म्याच्या जीवनास पूर्णत्व प्राप्त करून दिले असे म्हटले तरी चुकीचे होऊ नये.

२३ डिसेंबर १९२६ रोजी स्वामी श्रध्दानंद हे अमर शहीद स्वामी श्रध्दानंद झाले पंडित जवाहरलाल नेहरू यानी आपल्या आत्मकथेत लिहिले आहे. स्वामी श्रध्दानंद हे आजापणात खाटेवर विश्रांती घेत असता एका धर्मवेडया मुस्लिमाने गोरखा पलटणीच्या बंदुकीशी स्वतःची छाती भिडवली , त्या वीराला असे मरण यावे ? या घटनेमुळे एवढेच दिसून येते की , जातीयतेमुळे आम्ही किती अवःपतित होऊ शकतो.

स्वामी श्रध्दानंद यांच्या मुत्युनंतर गुवाहटी येथे कॉंग्रेसचे अधिवेशन झाले. त्यामध्ये जो दुखवटयाचा ठराव करण्यात आला त्यात म्हटले आहे की, भारतमातेच्या एका वीर देशभक्त सुपुत्राच्या निधनामुळे देशाची कधी न भरुन येणारी हानि झाली आहे. त्यांनी दीन-पतितांना व दु:खीजनांना नेहमीच सहाय केले.

त्यांच्या महान कार्याची नोंद फारशी नाहो याचे एक कारण कदाचित असून शकते की, स्वामी श्रध्दानंद हे एक संन्यासी होते. निर्लेप निष्कमा, किर्ती, अविकार, प्रशंसा, यापासून फार दूर. त्यांच्या पावन स्मृतीस विनम्र अभिवादन

## जिरगे

सार्वजनिक आजोबा गणपतीचे व्यवस्थापक श्रध्दानंद समाज व हु. स्वामी श्रध्दानंद यांचे जिवन चरित्र व कार्याची माहिती सर्वांना असणे इष्ट वाटते म्हणून प्रदर्शित करीत आहे.

स्वामी श्रध्दानंद यांचे पूर्वाश्रमीचे नाव लाला मुन्सीराम, त्याचा जन्म जालंदर येथे झाला. लहान पणी शिक्षण घेऊन पंजाब विदयापीठाचे मॅट्रीक परिक्षेचा अभ्यास करुन वकिली पास झाले. बनारस येथे असतांना स्वामी दयानंद सरस्वतीची भेट होऊन त्यांच्याशी भार्मिक चर्चा करुन आर्य समाज संस्थेत दाखल झाले.

लला मुन्सीराम यांनी वकिलीची सनद घेऊन पंजाबातील जालदंर कोर्टात चांगला जम बसला पुढे लाहोर हायकोर्टाच्या प्रसिध्द वकीला बरोबर त्यांची गणना होऊ लागली लाला मुन्सीराम यांचे हिंदी, पंजाबी, उर्दू, इंग्रजी भाषेवर प्रभुत्व होते. जनता शिक्षण व जागृतीचे मोठे कार्य केले.

## सन्यास दिक्षा

राजकारण व धर्मकारण प्रमुख भाग घेऊ लागले त्यानंतर सर्व स्वत्याग करुन संन्यास दिक्षा घेतली व स्वामी श्रध्दानंद यानांवाने ओळखले जाऊ लागले. गुरुकुल कांगडी येथे राष्ट्रीय पाठशाळा काढली. हिमालयाच्या परिसरात संस्था स्थापन करुन संस्कृत हिंदी, इंग्रजी व उर्दू भाषेचे स्वातंत्र पाठय पुस्तके तयार करुन प्रसिध्द केली तेथलि स्नातक पदवीधर यांनी राष्ट्र सेवा व धमर सेवा करण्यात प्रामुख्याने भाग घेतला त्यांच्या शिष्यगणांत लालबहादुर शास्त्री , राजाराम शास्त्री , अलगुराय शास्त्री, प्रकाशवीर शास्त्री, लाल देवबंधु गुप्त, लाला खुशालचंद खुर्सद, लाला फिरोजचंद यांनी देश सेवेस हिरिरीने भाग घेतला व राजकारणात आदर्श स्थान प्राप्त केले.

इ. स. १९२० सली जालीयनबाला बाग येथील सभेत , त्यावेळचे इंग्रज गव्हर्नर जनरल ओडवायर व डि. एस. पी डायर यांनी जो गोळीबार केला त्यांत हजारा जखमी व शेकडो ठार झाले. त्यावेळी इंगग्रजा विरुध्द मोहीम काढून कॉग्रेस पक्षातर्फे गोळीबार चौकशी र्कण्य्अर्कीत्अ स्र्ॅ. विठठलभाई पटेल यांचा अध्यक्षतेखाली चौकशी कमिटी त्यासपुढे इंग्रज सरकारने बंदी घातली त्या कमिटीचे कामानिमित्त सरकारच्या बंदीहुकमा विरुध्द निषेध

सभा लाहोर येथ भरली होती. त्या सभेचे अध्यक्ष स्थान स्वामी श्रध्दानंद यांना देण्यात आले त्या सभेला लाला लजपतराय लाला दुनीचंद , बॅ सैफुददीन किश्चलु, म. गांधीची भाषणे झाली. मोहनदास करमचंद गांधी यांना लाहोरच्या प्रचंड सभेतनंद यांनी महात्मा गांधी असे संबोधले व तेव्हापासुन गांधीजीना महात्मा गांधी असे संबोधू लागले.

दिल्लीच्या जुम्मा मशिदीजवळ बांका प्रसंग गुदरला. इंग्रजांच्या संगिनी मशिखल्या गेल्या तेव्हा स्वामीजीनी जुम्मा मशिदीच्या महाव्दारावर उभे आपली छाती लषकरी जवानापुढे उघडी करुन चलाव दिल्लीच्या जुम्मा मशिदीत स्वामपेव्त कुराणाची शिकवण व मातृभूमी निष्ठा यावर व हिंदु मुसलमान ऐक्यावर प्रभावी भाषण झाले.

कॉग्रेसच्या स्वतंत्र चळवळीस शत देण्याकरिता इंग्रज सरकारने फोंडा झोडा यांनी तिने जातिय दंगली प्रोत्साहन दिले. हिंदु गरीब व दलित लोकांवर अत्याचार व धर्मांतर चळवळी जोरांत सुरु झाल्या वर्णाश्रमी लोकांच्या उच्चनीच जातीय भेदामुळे लोक खिश्चन व मुसलमान होऊ लागले हिंदु महासभा स्थापन केर्ला. जातीयता नष्ट करुन एक जात हिंदु ही चळवळ सुरु केली राजस्थानातील हजाो मलकान रजपुताना परत हिंदु धर्मात घेतले केरळ मध्ये मोपडबंडात सामील होऊन खिश्चन व मुसलमान झालेल्यांना शुध्दी करुन परत हिंदु धर्मात घेतले. वार्णश्रम व जातीय भेद नष्ट करुन एक जात हिंदु चळवळीचा प्रचार करुन तळमळीच्या ओजस्वी वाणीने ख-या शास्त्राचा प्रसार केला.

इ. स. १९२३ सली पुण्यात शिवाजी मंदीरांत केसरीचे संपादक साहित्य सम्राट न चि. उर्फ तात्यासाहेब केळकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत सदय स्थितीवर स्वामी श्रध्दानंदाचे ओजस्वी भाषण झाले. ख-या धर्माचे पालन असपृष्श व हरिजन करतात पन्हाळगड कडे जातांना छत्रपती माहाराजांच्या मागे मोगल सैनिक होते पुढे ओढयात छत्रपतीच्या घोडा जाई ना तेव्हा चार हरिजन मावळे ओढयाच्या पाण्यात आडवे पडले व जीव धोक्यांत घालून महारांजाना वाचविले गरुगोविंद सिंग, यांनी पंजाबमध्ये धर्माकरिता बादशहाशी लढणारे तरुण पाहिजेत ही हांक दिली. तेव्हां आठ असपृष्श तरुणांनी प्राण देण्याची शपथ घेतली सबब खराधर्म आचरणांत आहे , कोरडया कर्मकांडात व उच्च निचतेत नाही हे स्वामीजीनी पटविले.

इ. स. १९२४ डिसेंबर महिन्यांचे शेवटच्या आठवडयात बेळगांवला म. गांधीच्या अध्यक्षतेखाली अखिल भारतीय कॉग्रेस अधिवेशन भरले होते. त्यावेळी रेल्वे कान्दरन्स संगित

परिषद व हिंदु महासभा परिषदेची अधिवेशने भरली होती त्यात भारतीय पुढअ-यात सभा मंडपात म. गांधीबरोबर इतरा नेत्यासमवेत सक्रीय भाग घेतलेले मी प्रत्यक्ष पाहिले आहे.

इ.स.१९२६ सली डिसेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवडयाच्या मद्रासचे बॅ श्रीनिवास अय्यंगार यांच्या अध्यक्षतेखाली आसामध्ये गोहत्ती या शहरात भारतीय कॉग्रेसचे अधिवेशन भरणार होते स्वामी श्रध्दानंद दिल्लसि आजारी होते ता.१६ डीसेंबर १९२६ रोजी कॉग्रेस अध्याक्षांना तार पाठवून आजारामुळे हजर राहु शकत नाही पण हिंदु-मुसलमान ऐक्याबाबत संदेश पाठविला ता १८ डिसेंबर १९२६ रोजी दुपारी ४ वाजता स्वामीजीच्या निवासस्थानी अज्ञात इसमाने जाऊन धर्मावर चर्चा करावयाची आहे असे सांगुन बोलू लागला स्वामीजी त्याच्या प्रश्नाचे उत्तरे देऊ लागेल. पण मध्येच प्यावयास पाणी मागितले तेव्हा स्वामीजीचा सेवक पाणी आणण्यास गेला. इतक्यात हातातील बंदूकीने स्वामी श्रध्दानंदजीचा गोळया झाडून वध केला सर्व देश हळहळला इंग्लड, जर्मनी, फ्रान्स अमेरिका येथील अनेक श्रेष्ठ नेत्यांनी दु:खोदगार काढले स्वामी श्रध्दांनदजीना हौतात्म्य प्राप्त झाले.